

# दीपा विश्वास मुधोळ-मुंडे

# कल्याणकारी लोकसेवेचा वारसा जपणाऱ्या सनदी अधिकारी

परिचय

**अधिकाऱ्याचे नाव : दीपा विश्वास मुधोळ-मुंडे (भा. प्र. से.)**
**पदनाम : आयुक्त, पीएमपीएमएल (पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड)**
**जन्मतारीख : २७ नोव्हेंबर १९८५**

जीवनात यशस्वी होण्यासाठी केवळ ध्येय ठरवून चालत नाही, तर ते ध्येय गाठण्यासाठी आपल्या प्रयत्नांमध्ये सातत्य आवश्यक असते. सातत्य नसेल तर, ध्येय ठरवूनही त्याचा उपयोग नाही. भारतीय संस्कृतीत संस्काराला मोठे महत्त्व देण्यात येते. जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वयंशिस्तीसोबतच चांगले व सकारात्मक विचार आपण अनुसरणे, हेही तितकेच महत्वाचे आहे. तुम्ही ठरवलेले लक्ष्य हे तुम्हाला महाभारतातील अर्जुनाप्रमाणे दिसले पाहिजे, असे प्रेरणादायी विचार मांडत वडिलांच्या कल्याणकारी लोकसेवेचा वारसा आयएएस अधिकारी बनून पुढे चालविणाऱ्या दीपा मुधोळ-मुंडे यांच्या प्रशासकीय यशकथांचा ही मुलाखत सारांश आहे. सद्य:स्थितीत पीएमपीएमएल (पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड) च्या आयुक्तपदावरून प्रवासी सेवेचा डोलारा सांभाळणाऱ्या दीपा मुधोळ-मुंडे यांच्या आजवरच्या जीवनप्रवासाचा धांडोळा घेणारा हा लेखपट.

दीपा विश्वास मुधोळ-मुंडे या भारतीय प्रशासकीय सेवेतील सनदी अधिकारी मूळच्या कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्ह्यातील रहिवासी. त्यांचे वडील सिद्धाना पी. मुधोळ हे म्युन्सिपल कमिशनर म्हणून कार्यरत होते. वडील मोठ्या पदावर अधिकारी म्हणून कार्यरत असल्याने घरात शिक्षणपूरक व तितकेच शिस्तपूर्ण वातावरण होते. त्यात दीपा मुधोळ यांना लहानपणापासूनच शिक्षणाची आवड निर्माण झाली होती. आई भारती मुधोळ मुलांवर उत्तम संस्कार करत या एक सजग गृहिणी म्हणून आपली जबाबदारी पार पाडत होत्या. भाऊ प्रवीणकुमार मुधोळ यांनीदेखील बी.एस्सी. ॲग्री. करून पुढील तयारीसाठी ते दिल्लीला गेले. घरातील या सर्व वातावरणाचा परिणाम शालेय जीवनापासूनच त्यांच्यावर झाला. लहानपणापासूनच दीपा मुधोळ या एक हुशार विद्यार्थिनी म्हणून सुपरिचित होत्या. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणप्रवासात त्यांनी विविध शालेय स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवत चमकदार कामगिरी केली. पुढे जाऊन ही विद्यार्थिनी मोठी अधिकारी होणार, असा सर्वांनाच विश्वास होता. वडील अधिकारी असल्याने आपणही भविष्यात मोठे अधिकारी




व्हायचे, अशी प्रेरणा दीपा मुधोळ यांना वडिलांकडूनच मिळाली होती. नववीत शिकत असतानाच त्यांनी वडिलांप्रमाणे मोठे अधिकारी होण्याचे स्वप्न मनाशी बाळगले होते. कोणत्याही विषयाचे चिकित्सापूर्ण आकलन व अभ्यासातील सातत्य हे दीपा मुधोळ यांच्या शैक्षणिक यशाचे गमक राहिले. दावणगिरी येथील सेंट जॉन्स हायस्कूलमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या दीपा मुधोळ यांनी दहावीच्या परीक्षेत तब्बल ९५.३६ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला. पुढे विजापूर येथील पीडीजे पीयू कॉलेजमध्ये इयत्ता बारावीपर्यंतचे शिक्षण घेत दीपा मुधोळ यांनी बारावीच्या परीक्षेत ८५.३३ टक्के गुण मिळवले.

पदवी शिक्षणासाठी ग्रॅज्युएशन कॉलेज ऑफ एग्रीनिन्सल सायन्सेस, धारवाड या महाविद्यालयात दीपा मुधोळ यांनी बी. एस्सी.ला प्रवेश घेतला. बी. एस्सी. ॲग्रीकल्चर झालेले विद्यार्थी पुढे मोठे अधिकारी होतात, अशी सर्वांचीच धारणा असल्याने दीपा मुधोळ यांनीही याच उद्देशाने या महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. याचदरम्यान दीपा मुधोळ यांनी 'जनरल स्टडीज' या विषयाचाही अभ्यास करण्यास सुरुवात केली होती. एप्रिल २००७ मध्ये दीपा मुधोळ यांनी ग्रॅज्युएशन पूर्ण करत जून २००७ मध्ये लगेचच बंगळुरू गाठले व तेथे कन्नडा लिट्रेचरचे क्लासेस केले. त्यानंतर ऑक्टोबर २००७ मध्ये यूपीएससीच्या तयारीसाठी त्या राजधानी दिल्ली येथे रवाना झाल्या. तेथे मुख्य विषयासह इतर ऑप्शनल विषयांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. सन २००८ मध्ये यूपीएससी पीलिम्स पास झाल्यानंतर सन २००९ मध्ये यूपीएससी मेन्सही त्या पास झाल्या. मात्र, मुलाखतीत काहीशी निराशा झाली. परंतु, नाउमेद न होता दीपा मुधोळ यांनी २००९ मध्ये पुन्हा प्रयत्न केला. या परीक्षेचा निकाल २०१० मध्ये जाहीर झाला. या परीक्षेत ८७ वी रँक मिळवत त्यांनी आयपीएस पदाला गवसणी घातली. त्या वेळी त्यांना कर्नाटक कॅडर मिळाले. परंतु, व्हायचे तर 'आयएएसच', या निश्चयावर दीपा मुधोळ ठाम होत्या. त्यानंतर पुन्हा अभ्यासाला सुरुवात करत दीपा मुधोळ यांनी सन २०१० मध्ये परीक्षा दिली. या परीक्षेचा निकाल सन २०११ मध्ये जाहीर झाला. या वेळी ३० वी रँक मिळवत दीपा मुधोळ यांनी 'आयएएस' या पदाला गवसणी घातली. या वेळी त्यांना महाराष्ट्र केडर मिळाले.

**हे आयएएस होण्यासाठी गरजेचे!**

आयएएस होण्याच्या प्रवासात दीपा मुधोळ यांना वडिलांसह घरातील सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. अभ्यास करत असताना अभय ठाकूर (सिंक्रोनस आयएएस) यांचे सामान्य अध्ययन, निबंध व मुलाखतीसाठी उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले. नियमितपणे १० ते १२ तास अभ्यास करत दीपा मुधोळ यांनी आयएएस पदाला गवसणी घातली. युपीएससीचा अभ्यास करताना विषयांची निवड महत्त्वपूर्ण ठरते. एक स्पेशल सब्जेक्ट, करंट अफेअर्स व नंतर उर्वरित चार विषयांचा व्यवस्थित अभ्यास केल्यास यशापर्यंत पोहोचण्यास मदत होते. याशिवाय मुलाखतीसाठी तुमची परिपूर्ण तयारीही तितकीच आवश्यक असते. 'विश्लेषणात्मक कौशल्ये' निबंध, जीएस व मुलाखतीत चांगले गुण मिळवण्यास मदत करतात, असे मत दीपा मुधोळ व्यक्त करतात.

मसुरी येथील लाल बहादूर शास्त्री नॅशनल ॲकॅडमी ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन या संस्थेत आएएस प्रशिक्षण व डिस्ट्रिक्ट ट्रेनिंग संजीवकुमार सर व रुबल अग्रवाल या सनदी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केल्यानंतर

दीपा मुधोळ यांना चंद्रपूरब्रह्मपुरी एसडीएम म्हणून पदभार मिळाला. येथील कालावधीत 'कम्युनिटी फॉरेस्ट राईट्स'साठी दीपा मुधोळ–मुंडे यांनी अभिनव उपक्रम राबविले. 'फॉरेस्ट कन्झर्वेशन ॲक्ट' अंतर्गत वनसंपत्ती संकलन व उत्पादनासाठी त्यांनी स्थानिकांना प्राधान्य दिले. यानंतर जानेवारी २०१५ ते एप्रिल २०१७ या कालावधीत बुलढाणा जिल्हा परिषदेच्या सीईओ म्हणून कार्यभार पाहताना दीपा मुधोळ–मुंडे यांनी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले. यामध्ये 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या उपक्रमांतर्गत दीपा मुधोळ यांनी प्रभावी काम केले. जिल्हा परिषदेच्या अधिनस्त क्षेत्रीय स्तरावरील विविध संस्थांच्या इमारतींचे अद्ययावतीकरण करण्यावरही त्यांनी भर दिला. 'ज्ञानरचनावाद' या उपक्रमांतर्गत प्रत्येक मुलाचा एकसारखाच बौद्धिक विकास घडवून आणण्यासाठी अभिनव संकल्पनांची अंमलबजावणी दीपा मुधोळ यांनी केली. यादरम्यान ' ॲक्टिव्हिटी बेस्ड लर्निंग 'वर विशेष भर देण्यात आला. प्रत्येक तालुक्यात शिक्षकांच्या गाठीभेटी घेऊन चांगल्या कामाचे कौतुक करत त्यांचा आत्मविश्वास वाढवला. त्याचे सकारात्मक परिणाम अल्पावधीतच दिसून येऊ लागले. नवोदय परीक्षेत जिल्हा परिषदेच्या शाळांमधील ४८ विद्यार्थी सिलेक्ट झाले. जिल्हा परिषदेच्या शाळांना 'आयएसओ' मानांकन मिळवून देण्यातही दीपा मुधोळ–मुंडे यांचे काम लक्षणीय ठरले. बुलढाणा जिल्ह्यात ही अभिनव शैक्षणिक क्रांती घडवून आणण्यात दीपा मुधोळ यांचा वाटा महत्वपूर्ण होता. याशिवाय येथील कारकिर्दीत दीपा मुधोळ यांनी लेप्रोसिस व टीबी या साथरोगांबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली तसेच आवश्यक उपचार सुविधांची निर्मिती करून सार्वजनिक आरोग्याची काळजी वाहिली.

बुलढाणा येथे जिल्हा परिषद सीईओ पदाची जबाबदारी पार पाडल्यानंतर दीपा मुधोळ–मुंडे यांची नियुक्ती जीएसटी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे सहआयुक्तपदी झाली. येथील एप्रिल २०१७ ते डिसेंबर २०१८ या सेवाकाळात करप्रणालीचा बारकाईने अभ्यास करण्याची संधी त्यांना मिळाली. येथील दीड वर्षाच्या सेवेतील चांगला अनुभव पुढील सेवेसाठी नवा आत्मविश्वास देऊन गेल्याचे दीपा मुधोळ–मुंडे सांगतात.

डिसेंबर २०१८ ते ऑगस्ट २०२० या कालावधीत



**बालविवाह रोखण्यासाठी लक्षवेधी कार्य**

धाराशिवनंतर सप्टेंबर २०२० ते फेब्रुवारी २०२३ या कालावधीत सिडकोच्या मुख्य प्रशासकीय अधिकारी म्हणून दीपा मुधोळ मुंडे जबाबदारी पाहिली. येथील सेवाकाळातही अनेक महत्त्वपूर्ण् निर्णय घेत नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न दीपा मुधोळ–मुंडे यांनी केला. त्यानंतर बीड जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारत दीपा मुधोळ–मुंडे यांनी अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा या जिल्ह्यात घडवून आणल्या. विशेषत: बालविवाह प्रतिबंधक कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी या भागात त्यांनी केली. त्यासाठी १०९८ या हेल्पलाईन क्रमांकाची स्थापनाही करण्यात आली. सोळा प्रकरणांमध्ये सहभागी संबंधितांवर सामूहिक गुन्हे नोंदवले. त्यामुळे शेकडो बालविवाह रोखण्यात जिल्हा प्रशासनाला यश मिळाले. यासाठी दीपा मुधोळ–मुंडे यांना स्कॉच अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक सुविधा, 'वन नेशन वन रेशन' योजनेची प्रभावी अंमलबजावणी, मयत उसतोड कामगारांच्या वारसांना अर्थसाहाय्य, जॉब कार्डचे वितरण, साखर शाळा आदी उपक्रमांना दीपा मुधोळ–मुंडे यांनी गती प्रदान केली.



दीपा मुधोळ-मुंडे यांची नियुक्ती जिल्हाधिकारी, धाराशिव या पदावर झाली. धाराशिव जिल्हा मराठवाडा विभागातील एक अवर्षणग्रस्त जिल्हा असल्याने तेथे चारा छावण्यांच्या उभारणीतून पशुधनाचे संवर्धन व पाणीपुरवठा या दोन बाबींवर विशेष लक्ष दीपा मुधोळ यांनी दिले. तसेच लोकसहभागातून वृक्षारोपणाचा कार्यक्रम आपल्या कार्यकाळात सातत्याने राबवला. या तिनही उपक्रमांसाठी जिल्हा प्रशासनाला भारतीय जैन संघटनेचे उत्तम सहकार्य लाभले. जिल्ह्यातील वडगाव सिद्धेश्वर या गावातील वडाची झाडे रस्त्याच्या बांधकामात तोडली गेली. त्याबदल्यात दीपा मुधोळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाने शेकडो झाडे या भागात लावून निसर्गसंवर्धनाचे कार्य प्रभावीपणे केले. रोडसाईड प्लांटेशनला यादरम्यान विशेष प्राधान्य देण्यात आले. महिन्यातून एक दिवस सायकलचा वापर करत पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व लोकांना पटवून दिले. सीएसआर फंडातून सुमारे अडीच ते तीन कोटी रुपयांची कामे दीपा मुधोळ-मुंडे यांनी केली. त्या वेळी कोविड १९ चे वैश्विक संकट थोपविण्याचे आव्हान सर्वच सरकारी यंत्रणांसमोर होते. मात्र, दीपा मुधोळ-मुंडे यांनी हे आव्हान नियोजनबद्ध कामकाजाच्या माध्यमातून यशस्वीरीत्या थोपविले. कोविडच्या प्रारंभकाळात धाराशिव जिल्हा सुरक्षित ठेवण्यात त्या यशस्वी झाल्या. येथील सेवेत पोषण आहार योजनेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

बीड येथून दीपा मुधोळ-मुंडे यांची बदली पीएमपीएमएल (पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड) च्या आयुक्तपदी झाली. पीएमपीएमएलचा पदभार स्वीकारल्यानंतर प्रवासी वाहतूक व परिवहन सेवेसंदर्भात अनेक समस्या दीपा मुधोळ-मुंडे यांच्या निदर्शनास आल्या. या समस्यांचे निराकरण नियोजनबद्ध पद्धतीने करण्यासाठी दीपा मुधोळ-मुंडे यांनी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यास सुरुवात केली. चालक व वाहकांच्या सेवा प्रश्नांवरही त्यांनी काम करण्यास सुरुवात केली. पीएमपीएमएलच्या सेवांमध्ये तांत्रिक बदलांचे समायोजन करण्याचाही महत्त्वपूर्ण निर्णय दीपा मुधोळ-मुंडे यांनी घेतला. 'आपली पीएमपीएमएल' या ॲपची निर्मिती करत ग्राहकांना जलद सेवा व माहिती

**बस फ्रिक्वेन्सीसाठी आश्वासक प्रयत्न**

पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील ३८७ मार्गांव्यतिरिक्त नवीन बसमार्ग तयार करून बसची फ्रिक्वेन्सी प्रती तीन मिनिटापर्यंत करण्याची कार्यवाही लवकरच अंमलात आणण्याचा प्रयत्न दीपा मुधोळ-मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएमपीएमएल प्रशासन करत आहे. याशिवाय पॅसेंजर काऊंटर व प्रवास सवलतीच्या विविध योजना कार्यान्वित करण्यावर पुढील काळात भर देणार असल्याचे दीपा मुधोळ-मुंडे स्पष्ट करतात. प्रशासनात उत्साहपूर्ण वातावरण कायम असावे व त्याचा अनुकूल प्रभाव पीएमपीएमएल सेवेवर पडावा, यासाठी १६४८ कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्यात आले आहे. याशिवाय कर्मचाऱ्यांच्या बढतीचा प्रलंबित प्रश्नही सोडविण्यात दीपा मुधोळ-मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएमपीएमएल प्रशासनाने यश मिळविले आहे.

देण्यास सुरुवात केली. हा उपक्रम प्रवासी वर्गात सध्या फारच लोकप्रिय झाला आहे.

पुणे शहर हे भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या शहरांपैकी एक शहर म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी व विद्येचे माहेरघर असा समृद्ध वारसा या शहराला लाभला आहे. पीएमपीएमएल या शहरातील सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असून चौका–चौकातून आधुनिकतेच्या दारातून प्रवास करणारी संस्था आहे. पुणे शहर हे शिक्षण, नोकरी, उद्योजक या सर्वांचे आधुनिक उत्कृष्ट मध्यवर्ती केंद्र बनले आहे. येथे दररोज देशातील सर्व भागातून मोठ्या प्रमाणात रोजगारासाठी, शिक्षणासाठी, पर्यटनासाठी नागरिक येत असतात. या येणाऱ्या नागरिकांना / प्रवाशांना सक्षम सार्वजनिक वाहतूक सेवा पुरविण्याची महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ही सेवा बजावताना तंत्रज्ञानातील सर्व प्रणालींचा सर्वोत्तम वापर करून प्रवाशांना कमीत कमी बस भाडे आकारून सुरक्षित व शाश्वत सेवा पीएमपीएमएल पुरवित आहे. पुणे शहराच्या जलदगतीने होणाऱ्या विकासामध्ये 'पीएमपीएमएल' चा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. पुणे शहर, पुणे शहरा लगतचे 'औद्योगिक नगरी' म्हणून नावाजलेले पिंपरी–चिंचवड शहर या दोन्ही शहरालगत असणाऱ्या २० किलोमीटर हद्दीपर्यंतच्या नागरी व ग्रामीण भागामध्ये पीएमपीएमएल वाहतूक सेवा कार्यक्षमपणे पुरवित असल्याचे दीपा मुधोळ–मुंडे स्पष्ट करतात.

पुणे शहरातील ३८७ मार्गांवर सद्य:स्थितीत पीएमपीएमएलच्या १६५८ बसेस धावत असून, दररोज सुमारे १५ लाखांहून अधिक प्रवाशांना सेवा देत आहेत. पीएमपीएमएलच्या ताफ्यात डिसेंबर २०२५ अखेर दोन



हजार बसेस कार्यान्वित करण्यावर दीपा मुधोळ–मुंडे यांचा भर आहे. त्यासाठी पहिल्या टप्प्यातील चारशेपैकी १६० बस प्रशासनाला प्राप्त झाल्या असून, मे अखेर उर्वरित बसेस प्राप्त होणार आहेत. सध्याच्या ताफ्यातून सुमारे ३०० बस निष्कासित होणार असून, डिसेंबर २०२५ अखेर सुस्थितीतील अद्ययावत २००० बसेस शहरात धावतील व त्याद्वारे दररोज २० लाख प्रवाशांना सेवा देण्यात आम्ही यशस्वी होऊ, असा विश्वास दीपा मुधोळ–मुंडे व्यक्त करतात.

पीएमपीएमएलच्या प्रवाशांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी मोबाईल ट्रॅकिंग व मोबाईल टिकीट सुविधा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. याशिवाय पीएमपीएमएलच्या ताफ्यात काही जुन्या बसेसमुळे निर्माण होणारी ब्रेकडाऊनची समस्या निकालात काढण्यासाठी व्हेइकल हेल्पिंग मॉनिटरिंग सिस्टीम कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती दीपा मुधोळ–मुंडे देतात. वाहतुकी कोंडीत अडकलेल्या पुणे शहरात वाहक व चालक यांना ड्युटी करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे कधीकधी त्यांची मानसिकता प्रभावित होत असते. यातून प्रवाशांसोबत किरकोळ वादही होत असतात. मात्र, प्रवासी वर्गानेही वाहक व चालक वर्गास वेठीस न धरता त्यांना सहकार्य करण्याचे प्रसंगावधान दाखवले पाहिजे. पीएमपीएमएलची सेवा ही जनतेची हक्काची सेवा आहे, त्यासाठी प्रवासी वर्गाचेही उचित सहकार्य या सेवाविषयक उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अपेक्षित आहे. पीएमपीएमएलच्या वाहनचालकांनाही सध्या प्रशिक्षण देण्यात येत असून, यामुळे प्रवाशी व वाहक–चालक यांच्यात सुसंवाद स्थापित होईल, यादृष्टीने प्रशासनाचे प्रयत्न सुरु आहेत.

'आयटी सिटी' म्हणून गौरव होत असलेल्या पुणे







शहरात मेट्रो सेवेचे मोठे जाळे तयार होत आहे. अनेक प्रवासी मेट्रोला प्राधान्य देत आहे. मात्र, मेट्रो स्टेशनपासून त्यांचे प्रस्थान वेगवेगळ्या भागात असल्याने पीएमपीएमएल बसचा एक चांगला पर्याय त्यांना उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे दीपा मुधोळ मुंडे सांगतात. यासाठी बसफेऱ्यांचे मेट्रोच्या वेळेनुसार नियोजन व जादा फेऱ्यांची अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे. त्यासाठी मेट्रो स्टेशनजवळच बस डेपो तयार करण्याचे नियोजन आहे. पुणे शहरात विद्यार्थी वर्गाचीही संख्या मोठी आहे. विद्यार्थ्यांना बस प्रवासाकडे आकर्षित करण्यासाठी पीएमपीएमएलद्वारे बस पास सवलतीच्या आकर्षक योजना कार्यान्वित करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यासाठी शाळा व महाविद्यालय प्रशासनाशी संवाद साधून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी बससेवेचा फायदा घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

प्रशासकीय सेवेतील प्रत्येक जबाबदारी पार पाडताना प्रशंसापात्र काम करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दीपा मुधोळ-मुंडे यांचा विवाह सन २००७ च्या बॅचचे आयआरएस अधिकारी श्री. विश्वास सोपानराव मुंडे यांच्यासोबत झाला आहे. विश्वास मुंडे यांचे शालेय शिक्षण जिल्हा परिषद शाळा कण्हेरवाडी, ता. परळी, जि. बीड येथे झाले आहे. नववी ते बारावीपर्यंतचे शिक्षण मानवत येथे, तर नागपूर येथून त्यांनी बी. टेक. इन केमिकल इंजिनिअरिंग तर एलआयटी नागपूर येथून पदवी संपादीत केली आहे. सध्या ते पुणे येथे आयकर विभागात आयुक्त म्हणून कार्यभार पाहत आहेत. दीपा मुधोळ-मुंडे व विश्वास मुंडे यांच्या संसारवेलीवर विदिशा व उर्वी या कन्यारत्नांच्या रूपाने दोन फुले उमलली आहेत.

■